# शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे यांचे कार्यालय पुणे -१

१७ डॉ. आंबेडकर रोड, लाल देवळाजवळ पुणे-१

दुरध्वनी क्रमांक ०२०- २६१२२२१७ फॅक्स क- ०२०- २६१२२२१७

ई-मेल आयडी-11thonlineadmissiondydpune@gmail.com वेब साईट- WWW.dydepune.com


महत्त्वाचे

जा.क्र.शिउसं/उमाशि-४०३/११ वी/पुवि/१७

दिनांक :- 13 JUL 2017

**प्रति,**

**सर्व प्राचार्य, उपप्राचार्य,**

**(माध्यमिक/उच्च माध्यमिक शाळा), पुणे व पिंपरी चिंचवड मनपा क्षेत्र**

विषय :- **इयत्ता ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया पहिल्या गुणवत्ता यादीतील प्रवेशाबाबत**

**संदर्भ:-१) शासन निर्णय क्रमांक न्यायाप्र-२०१५/(६१/१५)एसडी-२ दि.२८.०३.२०१६**
**२) शासन निर्णय क्रमांक प्रवेश-२०१६/(१८०/१६)एसडी-२ दि.०७.१.२०१७.**
**३) या कार्यालयाचे प्रसिध्दी निवेदन दि. १५.०६.२०१७.**
**४) शासन पत्र दिनांक २७.०६.२०१७**

उपरोक्त विषयानुसार सूचित करण्यात येते की, **इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया २०१७-१८ चे कामकाज पुणे व पिंपरी चिंचवड, या महानगरपालिका क्षेत्रात शासन निर्णय दि. ०७.०१.२०१७ अन्वये सुरु करण्यात आलेले आहे. दिनांक १०.०७.२०१७ रोजी इ. ११ वी ऑनलाईन प्रवेशाची पहिली गुणवत्ता यादी जाहीर झालेली असुन दि.११.०७.२०१७ ते १३.०७.२०१७ या वेळेत विद्यार्थ्यांनी त्यांना ॲलॉट झालेल्या संबधित कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घेण्याबाबत कळविण्यात आलेले होते. परंतु विद्यार्थी व पालक यांच्या मागणीनुसार विद्यार्थ्यांना प्रवेश घेण्याबाबत १४.०७.२०१७ दु.१२.०० वाजेपर्यंत वेळ वाढवून देण्यात आलेली आहे.**

**तरी आपल्या कनिष्ठ महाविद्यालयात ज्या विद्यार्थ्यांना ॲलोकेशन झालेले आहे अशा विद्यार्थ्यांना दि. १४.०७.२०१७ रोजी दु. १२.०० वाजेपर्यंत ऑनलाईन प्रक्रियेद्वारे तात्काळ प्रवेश देण्यात यावा. इ.११ वी ऑनलाईन प्रवेशबाबत कामाकाजास प्रथम प्राधान्य देवून वेळेत प्रवेश ऑनलाईन अपडेट करावेत. आपल्या कनिष्ठ महाविद्यालयात ऑनलाईन प्रक्रियेद्वारे ॲलोकेशन झालेल्या व प्रवेशासाठी आलेल्या विद्यार्थ्यास प्रवेश देण्याची त्वरीत कार्यवाही करावी. याबाबत विलंब झाल्यास संबधित कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्यास जबाबदार धरण्यात येईल याची नोंद घ्यावी.**

सदरचे परिपत्रक या कार्यालयाच्या **www.dydepune.com** व इ.११वी ऑनलाईन प्रवेशाच्या **http://pune.11thadmission.net** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

(मिनाक्षी राऊत)
सहा शिक्षण संचालक
पुणे विभाग पुणे-१

**प्रत माहितीसाठी सविनय सादर :-**

१) मा. आयुक्त(शिक्षण) म.रा. पुणे

२) मा. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) म.रा.पुणे